# सायबर सुरक्षा बाबत कार्यशाळा संपन्न

**अकोट :** अकोट येथून जवळच असलेल्या पाथर्डी येथील निळकंठ सपकाळ कनिष्ट महाविद्यालय येथे नुकतीच सायबर सूरक्षे बाबत कार्यशाळा कार्यक्रम संपन्न झाला.

विश्वजगत



अभिजीत सोळंके
विशेष बातमी

यावेळी अकोला येथील शंकरलाल खंडेलवाल महावीद्यालयाचे प्राचार्य डॉ.जगदीश साबू, आणी भौतिकशास्त्र विभागाचे डॉ. हरिदास खरात यांच्या मार्गदर्शनाखाली सुमित सपकाळ,व अनिकेत भुडके या विध्यार्थ्यांनी सायबर शुरक्षा बाबत, ऑनलाईन फसवणूक,वाढता सोशियल मिडीयाचा वापर त्यामधून होणारी फसवणूक,आपण करीत असलेली ऑनलाईन खरेदी या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.

निळकंठ सपकाळ कनिष्ट महाविद्यालय पाथर्डी येथे नुकतीच सायबर शुरक्षा बाबत कार्यशाळा घेवून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक नंदकिशोर पि.मेतकर होते यावेळी हा कार्यक्रम क्विक हिल फाऊनडेशन पुणे आणी महाराष्ट सायबर सेल मुंबई यांच्या सहयोगाने व अकोला येथील शंकरलाल




खंडेलवाल महावीद्यालयाचे प्राचार्य डॉ.जगदीश साबू, आणी भौतिकशास्त्र विभागाचे डॉ.हरिदास खरात यांच्या मार्गदर्शनाखाली सुमित सपकाळ,व अनिकेत भुडके यांनी शाळेतील विध्यार्थ्यांना सायबरसुरक्षा म्हणजे काय ?आणी सायबर क्राईमचे कोणते प्रकार पडतात ,वाढत्या सोशल मिडीयाच्या माध्यमातून ऑनलाईन खरेदीची फसवणूक कसी होते, मिडीयाचा वापर त्यामधून होणारी फसवणूक ,नवनवीन मोबाईल मध्ये येणारे ऐप, फेसबुक अकाउंट हॅक कसे केले जाते फेक वेबसाईटस कशा ओळखाव्या ,एटी एम पासवर्ड,ओटीपी,याबाबत फसव्या लिंक पासून दूर राहणे या बाबत अकोला येथील शंकरलाल खंडेलवाल महावीद्यालयाचे विध्यार्थी सुमित सपकाळ व अनिकेत भुडके या विध्यार्थ्यांनी योग्य मार्गदर्शन केले यावेळी शाळेचे मुख्याध्यापक नंदकिशोर पि.मेतकर ,पर्यवेक्षक ,शिक्षक व सर्व शाळेचे विद्धार्थी व कर्मचारी उपस्थित होते.